क्र. १२९ पहिले वर्ष

१९ फेब्रुवारी २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील सातवा रविवार

### प्रस्तावना

आपण आपल्या मित्रांवर, नातेवाईकांवर मनोभावे प्रेम करीत असतो. परंतु ख्रिस्त आपल्याला त्याच्याही पलिकडे जाऊन उदात्त प्रेमाचा धडा घालून देतो की, ''तुम्ही आपल्या वैऱ्यावर प्रीती करा आणि जे तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा.'' परमेश्वर आपणांस द्वेष, मत्सर, हेवा, स्वार्थ ह्यांच्या पलिकडील उत्तम मानवी जीवनाचे उदाहरण घालून देत आहे. जे तुमच्यावर प्रेम करतात त्यांच्यावर तुम्ही प्रेम केलं तर तो प्रेमाचा सौदा झाला. म्हणून परमेश्वर म्हणतो, की तू संपूर्ण हृदयाने आपल्या वैऱ्यावरही प्रेम कर. ख्रिस्ताचा हा संदेश आपल्या प्रत्येकाच्या हृदयात दृढ व्हावा. सर्व जातीधर्माचे लोक प्रेमाच्या अतूट बंधनात जखडले जावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या**

हे प्रभो, तू आपल्या पुत्राद्वारे प्रकट केलेले शहाणपण व प्रीती आमच्या दृष्टीसमोर ठेव. आमच्या आचार व विचाराने ख्रिस्ताचे अनुकरण करण्यास आम्हांला साहाय्य कर. तो तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात एकच परमेश्वर असून, सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

प्रभू शब्दविधी

### पहिले वाचन

**लेवीय या पुस्तकातून घेतलेले वाचन १९:१-२. १७:१८**

**''तू आपल्या शेजाऱ्यावर स्वत:सारखी प्रीती कर.''**

परमेश्वर मोशेला म्हणाला, ''इस्राएलच्या सर्व मंडळीस सांग की, तुम्ही पवित्र असावे, कारण मी परमेश्वर तुमचा देव पवित्र आहे.''

''आपल्या मनात आपल्या भावाचा द्वेष बाळगू नको; आपल्या शेजाऱ्यांची अवश्य कानउघडणी कर. नाही तर त्याच्यामुळे तुला पाप लागेल. सूड उगवू नको किंवा आपल्या भाऊबंदापैकी कोणाचा दावा धरु नको, तर तू आपल्या शेजाऱ्यांवर स्वत:सारखी प्रीती कर; मी परमेश्वर आहे.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१०२:१-२,३-४,८-१०, १२-१३**

प्रतिसाद : **परमेश्वर दयाळू आणि कृपाळू आहे.**

१. हे माझ्या मना, परमेश्वराला धन्यवाद दे.
हे माझ्या सर्व अंतर्यामा,
त्याच्या पवित्र नामाला धन्यवाद दे.
हे माझ्या मना, परमेश्वराला धन्यवाद दे,
त्याचे सर्व उपकार विसरू नकोस.

२. तो तुझ्या सर्व दुष्कर्मांची क्षमा करतो,
तो तुझे सर्व रोग बरे करतो.
तो तुझा जीव विनाशगर्तेतून उध्दारतो,
तो तुला दया आणि करुणा ह्यांचा मुकूट घालतो.

३. परमेश्वर,दयाळू आणि कृपाळू आहे,
तो मंदक्रोध आणि दयामय आहे.
आमच्या अपराध्यांच्या मानाने
त्याने आमच्या दृष्कृत्यांबद्दल
आम्हांला प्रतिफळ दिले नाही.

४. पश्चिमेपासून पूर्व जितकी दूर आहे,
तितके त्याने आमचे अपराध
आमच्यापासून दूर केले आहेत.
जसा बाप आपल्या मुलांवर ममता करतो,
तसा परमेश्वर आपले भय धरणाऱ्यांवर ममता करतो.

### दुसरे वाचन

**पौलचे करिंथकरांस पहिले पत्र यतून घेतलेले वाचन ३:१६-२३**

**''सर्वकाही तुमचे आहे; तुम्ही ख्रिस्ताचे आहा आणि ख्रिस्त देवाचा आहे.''**

तुम्ही देवाचे मंदिर आहा आणि तुम्हांमध्ये देवाचा आत्मा निवास करतो हे तुम्हांस ठाऊक नाही काय? जर कोणी देवाच्या मंदिराचा नाश करतो तर देव त्याचा नाश करील. कारण देवाचे मंदिर पवित्र आहे, तेच तुम्ही आहा.

कोणी स्वत:ला फसवून घेऊ नये. ह्या युगाच्या दृष्टीने आपण ज्ञानी आहो असे जर तुमच्यापैकी कोणाला वाटत असेल तर त्याने ज्ञानी होण्याकरता मूर्ख व्हावे. कारण ह्या जगाचे ज्ञान देवाच्या दृष्टीने मूर्खपणा आहे. कारण ''तो ज्ञान्यांस त्यांच्याच धूर्तपणात धरतो,'' असा शास्त्रलेख आहे आणि ''ज्ञान्यांचे विचार व्यर्थ आहेत हे परमेश्वर ओळखतो,'' असा दुसरा शास्त्रलेख आहे. म्हणून माणसांविषयी कोणी अभिमान बाळगू नये, कारण सर्वकाही तुमचे आहे; पौल असो, अपुल्लो असो, अथवा केफा असो, जग असो, जीवन असो, अथवा मरण असो, वर्तमानकाळच्या गोष्टी असोत अथवा भविष्यकाळच्या गोष्टी असोत, सर्वकाही तुमचे आहे आणि तुम्ही ख्रिस्ताचे आहा आणि ख्रिस्त देवाचा आहे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**लूक १९:३८**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभूच्या नावाने येणारा राजा धन्यवादित असो!
स्वर्गात शांती आणि उर्ध्वलोकी गौरव!

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**५:३८-४८**

**''आपल्या वैऱ्यावर प्रीती करा.''**

येशूने आपल्या शिष्यांस म्हटले, ‘‘डोळ्याबद्दल डोळा आणि दाताबद्दल दात’’ असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे, मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर; जो तुझ्यावर फिर्याद करून तुझी बंडी घेऊ पाहतो त्याला तुझा अंगरखाही घेऊ दे, आणि जो कोणी तुला वेठीस धरुन एक कोस नेईल त्याच्याबरोबर दोन कोस जा. जो तुझ्याजवळ काही मागतो त्याला दे आणि जो तुझ्यापासून उसने घेऊ पाहतो त्याला पाठमोरा होऊ नको.

‘‘आपल्या शेजाऱ्यांवर प्रीती कर आणि आपल्या वैऱ्यांचा द्वेष कर,’’ असे सांगितले होते, ते तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांस सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यावर प्रीती करा आणि जे तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा. अशासाठी की, तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हावे; कारण तो वाईटांवर आणि चांगल्यांवर आपला सूर्य उगवतो आणि नीतिमानांवर आणि अनीतिमानांवर पाऊस पाडतो. जे तुमच्यावर प्रीती करतात त्यांच्यावर तुम्ही प्रीती केली तर तुमचे प्रतिफळ काय? जकातदारही तसेच करतात ना? आणि तुम्ही आपल्या बंधुजनांना मात्र प्रणाम करीत असला तर त्यात विशेष ते काय करता? परराष्ट्रीयही तसेच करतात ना? ह्यास्तव जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे तुम्ही पूर्ण व्हा.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, अखिल मानवजातीचे तारण व्हावे अशी आमच्या परमेश्वर पित्याची इच्छा आहे. सत्याचे ज्ञान मिळवण्यासाठी तो आम्हांला पाचारण करतो. संपूर्ण अंत:करणाने आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या.

**प्रतिसाद :** ऐक प्रार्थना प्रभू देवा.

१. निरनिराळ्या क्षेत्रामध्ये यशस्वी होऊ पाहणाऱ्या लोकांना त्यांच्या मार्गावरील अडचणींना तोंड देण्यास प्रभूने शक्ती व प्रेरणा द्यावी म्हणून प्रार्थना करू या.

२. लोक आजार, संकट, गरीबी, अन्यायाला तोंड देत आहेत. त्यांना प्रभूची कृपा व आशीर्वाद लाभावा म्हणून प्रार्थना करू या.

३. आपल्या पॅरिशमधील फादर्स, सिस्टर्स व विविध संघटनामध्ये कार्य करणाऱ्यांना परमेश्वराने मार्गदर्शन, प्रेरणा व चांगले आरोग्य द्यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. प्रसंगानुसार हेतू सादर करणे.

५. आता थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे प्रेमळ परमेश्वरा, तू आमचा आधार आणि सामर्थ्य आहेस. तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक आणि श्रध्देने करीत असलेल्या आमच्या विनंत्या आज मान्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो,मोठ्या श्रध्देने व सत्यनिष्ठेने आम्ही तुला ही दाने अर्पण करीत आहोत त्याचा स्वीकार कर. या दानांमुळे आम्हांला तुझ्या तारणदायी कृपेचे वरदान मिळो. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सर्वसमर्थ परमेश्वरा, आम्ही साजरा केलेल्या प्रेमसंस्काराला अनुसरून प्रेमाचरण करण्यास आम्हांला साहाय्य कर. परिपूर्ण प्रेमाचरणामुळे आम्हांला तुझ्या सहवासाचे भाग्य लाभो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभुख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

परमेश्वराने मानवाला आपल्या प्रतिमेप्रमाणे निर्माण केलेले आहे. ह्या पृथ्वीतलावरील जीवन जगत असताना माणसाने आपली ही प्रतिष्ठा जपण्यासाठी झटायचे असते. आजची तिन्ही वाचने त्यादृष्टीने आपल्याला मार्गदर्शन करतात. ह्या तीन वाचनांतील तीन वाक्यांवर आपण चिंतन करू या.

**अ) ‘‘मी, परमेश्वर तुमचा देव जसा पवित्र आहे तसे तुम्हीही पवित्र व्हा.’’ :** पावित्र्य हे परमेश्वराचे अंगभूत वैशिष्ट्य आहे अशी इस्राएली लोकांची धारणा होती. पवित्र कार्यासाठी निवडलेली व्यक्ती परमेश्वर अभिषिक्त करीत असतो, अशा व्यक्तीने इतरांपेक्षा अधिक सात्विकतेने जीवन जगावे अशी इस्राएली लोकांची अपेक्षा होती. आजच्या पहिल्या वाचनात (लेवीय १९:१-२, १७-१८), परमेश्वराचे हे अंगभूत वैशिष्ट्य अंगिकारण्यास आपल्याला पाचारण करण्यात आलेले आहे.

**ब) देवाचे मंदिर पवित्र आहे आणि ते तुम्हीच आहात :** आजच्या दुसऱ्या वाचनात संत पौल (१ करिंथ.३:१६-२३) करिंथच्या लोकांना त्याच्या जीवनातील प्रतिष्ठेची जाणीव करून देतो. तो त्यांना देवाच्या मंदिराची उपमा देतो. इतरत्र त्याने ‘तुमचे शरीर पवित्र आत्म्याचे मंदिर आहे’(१ करिंथ.६:१९) असे म्हटलेले आहे. इथे पौल आपल्याला एक नवा विचार देतो. कोणताही मनुष्य स्वपरिश्रमाने पवित्र बनू शकत नाही. त्याचे ज्ञानदेखील त्याला पवित्र करू शकत नाही. देवाचा त्याच्याठायी असलेल्या दिव्य उपस्थितीमुळे तो पवित्र बनत असतो.

**क) ‘‘जसा तुमचा स्वर्गीय पिता परिपूर्ण आहे तसे तुम्ही परिपूर्ण व्हा’’ :** आजच्या शुभवर्तमानात (मत्तय ५:३८-४८) परमेश्वराचे मानवावरील बिनशर्त प्रेम ही त्याच्या परिपूर्णतेची वा पावित्र्याची खूण आहे असे येशू शिकवितो. लूकच्या मते पावित्र्य हे दयाळूपणात दडलेले असते. येशू म्हणातो, ‘‘जसा तुमचा स्वर्गीय पिता दयाळू आहे असे तुम्हीही दयाळू व्हा’’(लूक ६:३६).

**आत्मपरीक्षण :** पावित्र्याविषयी माझी संकल्पना कशी आहे? माझ्या जीवनातील कोणकोणत्या बाबतीत परमेश्वर मला पवित्र, दयाळू आणि परिपूर्ण होण्यास बोलावीत आहे? ●●●

| फेब्रुवारी २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | तिसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम २० | धन्य. जशिंटो आणि फ्रांन्सिस्को मार्टो (हि) | : प्रवक्ता १:१-१०/मार्क ९:१४-२९ |
| मंगळ २१ | सं पीटर डेमियन (हि) | : प्रवक्ता २:१-११/मार्क ९:३०-३७ |
| बध २२ | राखेचा बुधवार (जां) | : योएल २:१२-१८/करिंथ.५:२०-६:२/मत्तय ६:१-६, १६-१८ |
| गुरू २३ | सं पॉलीकाप (जां) | : अनुवाद ३०:१५-२०/लूक ९:२२-२५ |
| शुक्र २४ | सं.लुईस व्हर्सिग्लिया आणि कॅलिस्टस कॅराव्हारिओ (जां) | : यशया ५८:१-९/मत्तय ९:१४-१५ |
| शनि २५ | सं मेखतिल्ड (जां) | : यशया ५८:९-१४/लूक ५:२७-३२ |